# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २१.०९.२०२१**

## जिल्हा : कोल्हापूर

| मागील आठवड्यातील हवामान (१५.०९.२०२१ ते २१.०९.२०२१) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज २२.०९.२०२१ ते २६.०९.२०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | दिनांक | २२ | २३ | २४ | २५ | २६ |
| ६.२ | २.६ | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.८ | पाऊस (मिमी) | ३३ | १४ | ४ | ६ | ७ |
| २८.८ | २९.५ | ३०.० | ३०.० | ३०.५ | ३१.० | ३१.८ | कमाल तापमान (अं.से.) | ३१.० | ३०.० | ३०.० | ३०.० | ३१.० |
| २०.४ | २०.५ | २०.६ | २०.५ | १९.८ | २०.० | २१.६ | किमान तापमान (अं.से.) | २४.० | २३.० | २३.० | २४.० | २४.० |
| ४ | ३ | ३ | ४ | ३ | ४ | ४ | स. ढग स्थिती (आकाश) | ७ | ७ | ८ | ८ | ७ |
| ४ | २ | ७ | ४ | ३ | २ | - | दु. | | | | | |
| ९५ | ९३ | ९३ | ९३ | ९५ | ९३ | ९२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९६ | ९६ | ९६ | ९८ | ९८ |
| ८६ | ६८ | ६९ | ७२ | ८१ | ७३ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७५ | ७७ | ७१ | ७० | ६८ |
| १.५ | १.० | १.६ | १.४ | १.३ | १.६ | १.२ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ७ | ६ | ५ | ५ | ४ |
| नै. | द.नै. | नै. | प.नै. | प. | प. | प.नै. | स. वाऱ्याची दिशा | प. | नै. | द.नै. | द.नै. | द.नै. |
| प.नै. | प.नै. | प.नै. | नै. | प. | प.नै. | - | दु. | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२१ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२१ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ५४.० | १५७५.२ | ७५ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश/ इशारा** | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २२ ते २६ सप्टेंबर दरम्यान आकाश ढगाळ राहण्याची व दिनांक २२ व २३ सप्टेंबर रोजी बऱ्याच ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या तर दिनांक २४ ते २६ सप्टेंबर दरम्यान काही ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान ३०.० ते ३१.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान २३.० ते २४.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ९६ ते ९८% तर दुपारची सापेक्ष आद्रता ६८ ते ७७% दरम्यान रहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०५ ते ०७ कि.मी. पर्यंत वाढण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित पल्ल्याच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त तसेच कमाल तापमान व किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | ➢ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून अँड्रॉइड ॲप्लिकेशन "मेघदूत " तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ "दामिनी" च्या अंदाजासाठी. अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>➢ पावसाची उघडीप पाहून व वारा शांत असतानाच पिकांवर किटकनाशक व बुरशीनाशकाची फवारणी करावी.<br>➢ पक्व झालेल्या खरीप पिकांची काढणी करावी व काढणी केलेला शेतीमाल पावसाची शक्यता असल्याने सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| **संदेश** | | कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २१ ते २३ सप्टेंबर पर्यंत बऱ्याच ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने शेतामध्ये साठणाऱ्या पावसाच्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| **भात** | पोटरी, फुलोरा ते दाने भरणे | ➢ पावसाची शक्यता असल्याने भात खाचरामध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त साठलेल्या पाण्याचा निचरा करावा.<br>➢ भात खाचरामध्ये पाण्याची पातळी भात पोटरीच्या अवस्थेत असताना ५ ते १० से.मी. ठेवावी तर फुलोरा व दाने भरण्याच्या अवस्थेत १० से.मी. ठेवावी. |
| **नाचणी** | वाढीची | ➢ काही ठिकाणी करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला आहे. प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी पिकावर डायथेन एम-४५ @ २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **रब्बी ज्वारी** | पेरणी | ➢ जिल्ह्यामधील पूर्वेकडील तालुक्यांमध्ये काही ठिकाणी रब्बी हंगामातील ज्वारीची पेरणी पावसाची उघडीप पाहून १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर या कालावधीत पावसाच्या ओलीवर ५ सें.मी. खोलीपर्यंत करावी. |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| | | ➢ बीजप्रक्रिया: पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास ४ ग्रॅम गंधक (३०० मेश पोताचे) चोळावे तसेच २५ ग्रॅम ॲझोटोबक्टर व पी.एस.बी. कल्चर चोळावेत. पेरणी अंतर: ४५ x १२ सें.मी. बियाणे प्रमाण:१० किलो प्रती हेक्टर.<br>➢ पेरणीसाठी सुधारित वाण: फुले अनुराधा, फुले चित्रा, फुले सुचित्रा, फुले वसुधा आणि फुले रेवती. |
| **मका** | फुलोरा | ➢ पिकावर अमेरिकन लष्करी आळीचा १०% पेक्षा जास्त प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी खालीलपैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची एकदा फवारणी घ्यावी.<br>➢ क्लोरानट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी. ०.४ मिली प्रति लिटर पाणी.<br>➢ किंवा स्पिनेटोराम ११.७ % एस.सी ०.५ मिली प्रती लिटर पाणी<br>➢ किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५% एस.जी. ०.४ ग्रॅम प्रती लिटर पाणी. |
| **मूग** | पक्वता | ➢ पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेती मालाची कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. शेती मालाची साठवण कोंदट व ओलसर जागेत करू नये. |
| **भुईमुग** | शेंगा भरणे | ➢ भुईमुग शेतामध्ये पाणी साठल्यास त्वरित निचरा करावा. |
| **सोयाबीन** | शेंगा भरणे ते पक्वता | ➢ सोयाबीन बिजोत्पादन क्षेत्रामध्ये शेंगा करपा / पानावरील ठिपके या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी थिओफेनेट मिथाईल@ १ किलो/हे. किंवा टेब्यूकोनॅझोल @ ६२५ मिली/हे. किंवा टेब्यूकोनॅझोल + सल्फर १लिटर/हे. किंवा हेक्झाकोनॅझोल @ ५०० मिली/हे. किंवा पायरोक्लोस्ट्रोबिन @ ५०० ग्रॅम/हे. प्रती ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.फवारणी करताना स्टीकरचा वापर करावा व फवारणी पावसाची उघडीप पाहून व वारा शांत असतानाच करावी. |
| **ऊस** | वाढीची | ➢ सहा ते आठ आठवडे वयाच्या आडसाली लागणीस को.८६०३२ जातीसाठी शिफारशीत (५००:२००:२०० किलो नत्र, स्फुरद व पालाश) खत मात्रेच्या ४० टक्के नत्र खताची दुसरी मात्रा द्यावी यासाठी २०० किलो नत्र (४३४ किलो युरिया) व इतर जातींसाठी शिफारशीत (४००:१७०:१७० किलो नत्र, स्फुरद व पालाश) नत्र खत मात्रेच्या ४० टक्के नत्र खताची दुसरी मात्रा द्यावी यासाठी १६० किलो नत्र (३४७ किलो युरिया) प्रती हेक्टरी याप्रमाणात द्यावे. खत मात्रा देताना ६ किलो युरियासाठी १ किलो निंबोळी पेंडीची भुकटी चोळून द्यावी. |
| **कांदा** | लागवड (रांगडा) | ➢ पावसाची उघडीप पाहून रांगडा कांद्याची लागवड करावी त्यासाठी बसवंत ७८०, फुले समर्थ, एन -२-४-१ या जातींचा वापर करावा. लागवडीचे अंतर:१५x१० सें.मी. बीजप्रक्रिया : अझोस्पीरीलम व स्फुरद विरघळविणारे जीवाणू २५ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास चोळावे. |
| **जनावरे** | वाढीची | ➢ कोल्हापूर जिल्ह्यात पावसाची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत.<br>➢ सर्व निरोगी जनावरांना लाळ खुरकत रोगाची प्रतिबंधक लस सप्टेंबर महिन्यामध्ये टोचून घ्यावी. |

ठिकाण : २१.०९.२०२१

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**